सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :- roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक : विकाअ/शिक्षण/२०२२/ 2704
दिनांक 11 OCT 2022

प्रति,
प्राचार्य,
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था
अमरावती विभाग,अमरावती.

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत नियमबाह्य प्रवेश देऊन शैक्षणिक भ्रष्टाचार केला जात असल्याबाबत

संदर्भ : मा.संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.अ.२अ/एडीएम/२०२२/३३८ दिनांक १० ऑक्टोबर २०२२

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, वरील विषयाबाबतचे मा.संचालक,तंत्रशिक्षण,म.रा.मुंबई यांचे व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत नियमबाह्य प्रवेश देऊन शैक्षणिक भ्रष्टाचार केला जात असल्याबाबतचे संदर्भिय पत्र सोबत जोडलेले आहे, सदर पत्राचे कृपया अवलोकन करावे व त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

याबाबत आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवी पूर्व तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशांचे विनियमन) नियम २०१७ च्या पोट नियम १३ तसेच सुधारीत नियमांमध्ये नमूद केल्यानुसार संस्थास्तरीय कोट्यातील जागा, अल्पसंख्यांक कोट्यातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश विनाअनुदानीत संस्थेतील संचालक किंवा प्राचार्य यांनी प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठीची कार्यपध्दती निश्चित केलेली आहे.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांनी त्यांना प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील असलेल्या काही संस्था सदर नियमांचे उल्लंघन करुन प्रवेश प्रक्रिया राबवित असल्याचे संदर्भाधीन पत्रान्वये नमूद केले आहे.

त्याअनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील येणाऱ्या सर्व व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना सूचित करण्यात येते की, महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवी पूर्व तांत्रिक पाठ्यक्रमांच्या प्रवेशांचे विनियमन) नियम २०१७ मधील नियम १३ मधील तरतूदीनुसारच संस्थास्तरीय कोट्यातील जागा, अल्पसंख्यांक कोट्यातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश प्रक्रिया करावी. तसेच राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष, मुंबई यांनी त्यांचे परिपत्रक क्रमांक तंशिप्र-१२२२/प्र.क्र.०६/सीईटी/२०२२/१५८९, दिनांक ३०.९.२०२२ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

प्रवेशाबाबतचे सक्षम प्राधिकारी हे मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई हे असल्याने प्रवेशासंदर्भात त्यांचेकडून वेळोवेळी देण्यात येणाऱ्या सुचनांचे काटेकोरपणे पालन न करता नियमबाह्य पध्दतीने करण्यात आलेल्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात येणार नाही याची गांभार्याने नोंद घ्यावी.

प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
अमरावती.

प्रत: प्रोग्रामर, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय अमरावती यांना संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.

महाराष्ट्र शासन

तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रं.१९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४५०
ई-मेल – desk2a@dtemaharashtra.gov.in वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्रमांक: २अ/एडीएम/ २०२२/३३८ दिनांक : 10 OCT 2022

प्रति,
सर्व प्राचार्य/संचालक,
सर्व व्यावसायिक तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्था

विषय : **व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेत नियमबाह्य प्रवेश देऊन शैक्षणिक भ्रष्टाचार केला जात असल्याबाबत**

संदर्भ : मा.आयुक्त, राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांचे पत्र क्रमांक तंशिप्र/१२२२/ प्र.क्र.३५/प्रनिप्रा/१०२०२, दिनांक ७.१०.२०२२

वरील विषयाबाबत कळविण्यात येते की, महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवी पूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशांचे विनियमन) नियम २०१७ च्या पोट नियम १३ तसेच सुधारीत नियमांमध्ये नमूद केल्यानुसार संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश विनाअनुदानीत संस्थेतील संचालक किंवा प्राचार्य यांनी प्रवेश प्रक्रिया राबविण्यासाठीची कार्यपध्दती पध्दती निश्चित केलेली आहे.

राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांनी त्यांना प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील असलेल्या काही संस्था सदर नियमांचे उल्लंघन करुन प्रवेश प्रक्रिया राबवित असल्याचे असल्याचे संदर्भाधीन पत्रान्वये नमूद केले आहे.

याअनुषंगाने तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थांना सूचित करण्यात येते की, **महाराष्ट्र विनाअनुदानीत खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (पूर्णवेळ व्यावसायिक पदवी पूर्व तांत्रिक पाठयक्रमांच्या प्रवेशांचे विनियमन) नियम २०१७ मधील नियम १३ मधील तरतूदीनुसारच संस्थास्तरीय कोटयातील जागा, अल्पसंख्यांक कोटयातील जागा आणि केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांवर प्रवेश प्रक्रिया करावी. तसेच राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांनी त्यांचे परिपत्रक क्रमांक तंशिप्र-१२२२/प्र.क्र.०६/सीईटी/२०२२/१५८९,दिनांक ३०.९.२०२२ अन्वये दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.**

प्रवेशाबाबतचे सक्षम प्राधिकारी हे मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई हे असल्याने प्रवेशासंदर्भात त्यांचेकडून वेळोवेळी देण्यात येणा-या सुचनांचे काटेकोरपणे पालन न करता नियमबाहय पध्दतीने करण्यात आलेल्या प्रवेशांना प्रवेश नियामक प्राधिकरणाकडून मान्यता देण्यात येणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

(डॉ.अभय वाघ)
संचालक, तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

प्रत : मा.आयुक्त,राज्य सामायिक प्रवेश परीक्षा कक्ष,मुंबई यांना माहितीस्तव व सदर परिपत्रकास आपल्या कार्यालयाच्या संकेतस्थळावरून प्रसिध्दी देण्यात यावी.

प्रत : माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी ----

१) सर्व सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय मुंबई, पुणे,नाशिक,औरंगाबाद,अमरावती व नागपूर त्यांना सूचित करण्यात येते की, आपल्या अधिपत्याखालील सर्व तांत्रिक व्यावसायिक पदवी आणि पदव्युत्तर पदवी

अभ्यासक्रमांच्या संस्थांच्या निदर्शनास सदर परिपत्रक आणावे व या बाबतची अंमलबजावणी काटेकोंटपणे करावी. तसेच सदर परिपत्रकास विस्तृत प्रसिध्दी आपल्या स्तरावरुन देण्यात यावी.

२) माहिती तंत्रज्ञान कक्ष(कार्यासन क्रमांक ३) मुख्य कार्यालय मुंबई यांना कळविण्यात येते की, सदर परिपत्रक संचालनालयाच्या संकेतस्थळावर ठळकपणे प्रसिध्द करण्यात यावे.